## राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, कोंकण खंडपीठ यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ चे कलम १८ (१) अन्वये झालेली तक्रार

### तक्रार क्रमांक : ५०२/२०२२

**तक्रारकर्ता,** श्रीमती तृप्ती जयहिंद पाटील,
मु.पो.विनायक (डोंगरआळी), केगांव,
ता.उरण, जि.रायगड ४०० ७०२.

विरुध्द

विद्यमान जन माहिती अधिकारी तथा ग्रामविकास अधिकारी, ग्रामपंचायत कार्यालय केगांव, ता.उरण, जि.रायगड ४०० ७०२.

तत्कालीन जन माहिती अधिकारी तथा ग्रामविकास अधिकारी, ग्रामपंचायत कार्यालय केगांव, ता.उरण, जि.रायगड ४०० ७०२.

**तक्रार सुनावणीचा दिनांक** : २/४/२०२६

| माहितीचा अर्ज दाखल केल्याचा दिनांक | जन माहिती अधिकारी यांच्या उत्तराचा दिनांक | प्रथम अपिल अर्ज प्राप्त दिनांक | प्रथम अपिल आदेश प्राप्त दिनांक |
|---|---|---|---|
| २४/१/२०२२ | ---- | ४/३/२०२२ | २८/३/२०२२ |

तक्रारकर्ता यांनी दि.५/७/२०२२ रोजीच्या अर्जान्वये " माहिती दिली नाही " असे कारण नमूद करुन कलम १८(१) अन्वये तक्रार अर्ज दाखल केला आहे. सदर तक्रार अर्जावर आज दिनांक २/४/२०२६ रोजी सुनावणी घेण्यात आली.

सदर सुनावणीस तक्रारकर्ता उपस्थित आहेत. तसेच विद्यमान जन माहिती अधिकारी श्री.प्रमोद मधुकर मुकुंदे, ग्रामपंचायत अधिकारी, ग्रुप ग्रामपंचायत केगाव उपस्थित व तत्कालिन जन माहिती अधिकारी श्री.वैभव बाळकृष्ण पाटील, सध्या कार्यरत-ग्रामपंचायत अधिकारी, पंचायत समिती खालापूर अनुपस्थित आहेत. (कार्यालयाद्वारे नोटीस पाठविलेबाबतचे ट्रॅकिंग रिपोर्ट सादर करण्यात आले असून, ते नस्तीसोबत अभिलेखावर ठेवण्यात आलेले आहेत)

तक्रारकर्ता यांनी मूळ अर्जान्वये जन माहिती अधिकारी यांचेकडे खालीलप्रमाणे माहिती मागितली आहे.

" *पर्यावरण प्रदुषण, ग्रामस्थांच्या आरोग्याबाबत व शासनाची फसवणूक केल्याबाबत अर्ज दि.५/११/२०१९, दि.१५/३/२०२१, स्मरणपत्र दि.२८/५/२०२१, दि.२३/६/२०२१, दि.३०/८/२०२१ सरपंच/ग्रामसेवक ग्रुप ग्रा.पं.केगाव यांस. १) उपरोक्त विषयान्वये दिलेल्या अर्ज व स्मरणपत्रानुसार केलेल्या कारवाईच्या प्रती माहिती अधिकारात मिळाव्यात. २) उपरोक्त सर्व अर्ज व स्मरणपत्रानुसार अर्जदारास दिलेला अहवाल/उत्तराच्या प्रती सहि शिक्शानिशी सत्यप्रत करून मिळाव्यात.* "

तद्नंतर तक्रारकर्ता यांनी प्रथम अपिलीय प्राधिकारी यांचेकडे कलम १९ (१) अन्वये प्रथम अपील दाखल केले.

तक्रारकर्ता यांनी दाखल केलेल्या प्रथम अपीलावर तत्कालीन प्रथम अपीलीय प्राधिकारी यांनी सुनावणी घेऊन दि.२८/३/२०२२ रोजी, " *जन माहिती अधिकारी श्री.वैभव बाळकृष्ण पाटील ग्रामविकास अधिकारी यांनी या आदेशाच्या तारखेपासुन आजच अपीलकार यांना माहिती पुरवावी.* " असा निर्णय दिलेला आहे.

तक्रारकर्ता यांनी निवेदन केले की, त्यांना अद्यापावेतो माहिती प्राप्त झालेली नाही.

विद्यमान जन माहिती अधिकारी यांनी निवेदन केले की, तक्रारकर्ता यांनी ज्या अर्जाच्या संदर्भात माहितीची मागणी केली आहे. ते अर्ज त्यांचे कार्यालयात आढळून येत नाही. त्यामुळे ही माहिती तक्रारकर्ता यांना पुरविता आली नाही.

तक्रारकर्ता यांनी सदर अर्ज ग्रामपंचायत कार्यालयात सादर केलेबाबत ग्रामपंचायत कार्यालयाचा दिनांकासहित असलेल्या शिक्क्याची प्रत सादर केली. त्यावरून त्यांनी सदर अर्ज ग्रामपंचायतीकडे दिलेले आहेत हे स्पष्ट होते.

यास्तव आयोग पुढील आदेश देत आहे.

**आदेश**

१. उपरोक्त विवेचनात नमूद परिस्थितीत सदर अर्ज ग्रामपंचायत कार्यालयात आढळून येत नसल्यास जन माहिती अधिकारी यांनी त्यासाठीची जबाबदारी निश्चित करावी व यासंदर्भात जी वस्तुस्थितीदर्शक माहिती असेल ती तक्रारकर्तास १५ दिवसात समक्ष विनामूल्य पुरवावी.

२. तत्कालिन जन माहिती अधिकारी श्री.वैभव बाळकृष्ण पाटील, ग्रामपंचायत अधिकारी, ग्रुप ग्रामपंचायत केगाव यांनी तक्रारकर्ता यांच्या दिनांक २४/१/२०२२ रोजीच्या माहिती अर्जाला अनुसरुन विहीत मुदतीत तसेच प्रथम अपील आदेशांनतर देखील माहिती पुरविली नाही. म्हणून त्यांचेविरुध्द माहितीचा अधिकार अधिनियम २००५ अंतर्गत २० (१) अन्वये माहिती पुरविण्यास झालेल्या विलंबाच्या प्रतिदिन रु.२५०/- (अधिकतम रु.२५,०००/-) इतक्या शास्तीची कार्यवाही का करण्यात येऊ नये, याचा लेखी खुलासा त्यांनी पुढील सुनावणीच्या वेळी आयोगाकडे सादर करावा. अन्यथा, त्यांचे काहीही म्हणणे नाही असे गृहीत धरुन शास्तीचे आदेश कायम केले जाऊ शकतील, याची नोंद घ्यावी.

३. प्रस्तुत प्रकरणाची पुढील सुनावणी दि.१२/५/२०२६ रोजी दुपारी २.०० वाजता होईल.

**सही/-**
**(शेखर चन्ने)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**कोंकण खंडपीठ**

कोंकण भवन,
बेलापूर, नवी मुंबई : ४०० ६१४.
दिनांक : २ एप्रिल २०२६ .

**प्रत आवश्यक कार्यवाहीस्तव रवाना**

तत्कालिन जन माहिती अधिकारी श्री.वैभव बाळकृष्ण पाटील, ग्रामपंचायत अधिकारी, ग्रुप ग्रामपंचायत केगाव – **यांना प्रत**
-- विद्यमान जन माहिती अधिकारी तथा
ग्रामविकास अधिकारी, ग्रामपंचायत कार्यालय केगांव,
ता.उरण, जि.रायगड ४०० ७०२. **यांचेमार्फत रवाना.** (विद्यमान जन माहिती अधिकारी यांनी सदर आदेशाची प्रत तात्काळ तत्कालिन जन माहिती अधिकारी यांना बजावून पोहोच आयोगास सादर करावी.)

## विवेचन

उपरोक्त आदेशानुसार सदर प्रकरणाची पुढील सुनावणी आज रोजी आयोजित करण्यात आली.

सदर सुनावणीस तक्रारकर्ता उपस्थित आहेत. तसेच विद्यमान जन माहिती अधिकारी श्री.प्रमोद मधुकर मुकुंदे, ग्रामपंचायत अधिकारी, ग्रुप ग्रामपंचायत केगाव व तत्कालिन जन माहिती अधिकारी श्री.वैभव बाळकृष्ण पाटील, सध्या कार्यरत-ग्रामपंचायत अधिकारी, ग्रुप ग्रामपंचायत वासांबे खालापूर उपस्थित आहेत.

विद्यमान जन माहिती अधिकारी यांनी निवेदन केले की, आता दि.२३/४/२०२६ रोजी उत्तर दिले आहे.

तत्कालिन जन माहिती अधिकारी श्री.वैभव बाळकृष्ण पाटील ग्रामपंचायत अधिकारी, ग्रुप ग्रामपंचायत केगाव यांनी लेखी खुलासा सादर केला, त्यामध्ये त्यांनी म्हटले केले की, दि.२/४/२०२६ रोजीच्या सुनावणीसाठी त्यांनी ऑनलाइन उपस्थित राहणेबाबत दि.२५/३/२०२६ रोजीचे पत्र आयोगाच्या ईमेल आयडीवर पाठविले होते. परंतु सदर सुनावणीकरिता ऑनलाइन उपस्थित राहण्याबाबत कार्यालयाकडून काहीच कळविले नाही. केगाव ग्राम विकास अधिकारी म्हणून ते कार्यरत असताना त्यांचेकडे बांधपाडा ग्रामपंचायतीचा अतिरिक्त कार्यभार देण्यात आला होता दोन्ही मोठया ग्रामपंचायत असल्याने बांधपाडा येथे कार्यरत असताना माहे मार्च मध्ये सदस्यामध्ये वाद झाल्याने त्यानंतर आपली तब्येत बरी नसल्याने आपण वैद्यकीय रजेवर गेलो होतो. त्याच कालावधीत तक्रारकर्ता यांचा अर्जानुसार गट विकास अधिकारी पंचायत समिती उरण यांचे जा.क्र.ग्रा.प.विभाग वशी ५०२/२०२२ दि.२८/४/२०२२ नुसार माझी विभागीय खाते चौकशी दोषारोप क्रमांक ५ ने सुरू करण्याचा पत्रव्यवहार मुख्य कार्यकरी अधिकारी, रा.जि.प.अलिबाग यांना सादर केला होता. यामधील दोषारोष क्र.५ माहिती न पुरविलेबाबत होता याप्रकरणी आपली एक वेतनवाढ कायमस्वरूपी रोखण्यात आली आहे. न्यायालयाच्या आदेशानुसार एकाच दोषासाठी वारंवार शिक्षा करता येत नाही. तक्रारकर्ता यांच्या माहितीबाबत आपणास यापूर्वीच शिक्षा झालेली असल्याने सदर शास्ती आदेश करण्यात येवू नये असे म्हटले आहे.

आपल्या खुलाशात त्यांनी पुढे म्हटले की, ते केगाव येथे ग्रामविकास अधिकारी म्हणून कार्यरत असताना तक्रारकर्ता वारंवार एकाच विषयाचे अनेक अर्ज करीत असत. तक्रारकर्ता यांना वेळोवेळी सर्व माहिती अर्जाची माहिती दिली होती. परंतु आपण वैद्यकीय रजेवर असताना व आपली बदली झाल्याने तक्रारकर्ता यांना संबंधित माहिती अर्जाची माहिती देता आली नाही. त्यानंतर आपण केगाव ग्रामपंचायत कार्यभार ग्रामविकास अधिकारी रविंद्र म्हात्रे यांचेकडे

सोपविला असेही त्यांनी म्हटले आहे. या खुलाशासोबत त्यांनी शिक्षाआदेश, दोषारोपपत्र व खाते चौकशी आदेश प्रती जोडल्या आहेत.

श्री.वैभव पाटील यांनी Maqbool Hussain Vs. The State of Bombay & Jagjit Singh Vs. State of Punjab या प्रकरणात मा.सर्वोच्च न्यायालयाने १९५३ AIR ३२५ व १९५३ SCR ७३० या प्रकरणात दिलेल्या आदेशाचा आधार घेतलेला आहे. त्याचप्रमाणे S.A.Venkataraman Vs. The Union of India या प्रकरणात मा.सर्वोच्च न्यायालयाने दि.३०/३/१९५४ रोजी दिलेल्या आदेशाचा आधार घेतलेला आहे. रिट याचिका क्र.२४१७३/२०२० या प्रकरणात दि.१२/१/२०२३ रोजी पारित केलेल्या आदेशाचा आधार घेतलेला आहे.

एकाच दोषारोपासाठी व एकाच गुन्हयासाठी दोनवेळा शिक्षा देता येऊ शकत नाही हे कायद्याचे सर्व मान्य तत्व आहे. तथापि याठिकाणी माहितीचा अधिकार अधिनियमाच्या तरतूदी लक्षात घेणे आवश्यक आहे.

माहितीचा अधिकार अधिनियम २००५ अंतर्गत कलम २० (१) नुसार केंद्रिय माहिती आयोगाने किंवा यथास्थिती राज्य माहिती आयोगाने कोणत्याही तक्रारीवर किंवा अपीलावर निर्णय देतेवेळी केंद्रिय जन माहिती अधिकारी किंवा राज्य जन माहिती अधिकारी यांना कोणत्याही वाजवी कारणाशिवाय माहिती मिळणेबाबतचा अर्ज स्विकारण्यास नकार दिला आहे किंवा कलम ७ च्या पोटकलम १ अन्वये विनिर्दिष्ट वेळेत माहिती सादर केलेली नाही किंवा माहिती मिळण्यासाठी केलेली विनंती दृष्ट हेतूने नाकारलेली आहे किंवा जाणूनबुजून चुकीची, फसवणूक किंवा दिशाभूल करणारी माहिती दिली आहे किंवा मागणी केलेली माहिती नष्ट केली आहे किंवा माहिती सादर करण्यात कोणत्याही प्रकारे अडथळा आणाला आहे. असे आयोगाचे मत झाले असेल तर तो अर्ज स्विकारेपर्यंत किंवा माहिती देईपर्यंत प्रत्येक दिवसाला रू.२५० इतकी शास्ती लादेल. तथापि अशा शास्तीची एकूण रक्कम रू.२५००० पेक्षा अधिक असणार नाही.

या अधिनियमाच्या कलम २० (२) मधील तरतूद अशी आहे की, केंद्रिय माहिती आयोग किंवा राज्य माहिती आयोगाच्या अपील किंवा तक्रार निर्णय प्रक्रियेवर असे मत झाले की, जन माहिती अधिकारी यांनी कोणत्याही वाजवी कारणाशिवाय आणि सातत्याने माहिती मिळणेबाबतचा अर्ज स्विकारण्यात कसुर केली आहे किंवा कलम ७ च्या १ अन्वये माहिती सादर केलेली नाही किंवा माहिती मिळणेची विनंती दृष्ट हेतूने नाकारलेली आहे किंवा जाणुनबुजून चुकीची किंवा दिशाभूल करणारी माहिती दिली आहे किंवा मागीतलेली माहिती नष्ट केलेली आहे किंवा माहिती सादर करण्यात कोणत्याही प्रकारे अडथळा आणला आहे तर आयोग यथास्थिती केंद्रिय जन माहिती अधिकारी किंवा राज्य जन माहिती अधिकारी याविरूध्द त्याला लागू असलेल्या सेवानियमान्वये शिस्तभंगाची कारवाईची शिफारस करेल.

या दोन्ही तरतूदीचे वाचन केल्यावर असे लक्षात येईल की, एखाद्या प्रकरणात माहिती देण्यास विलंब केला अथवा माहिती दिली नाही तर प्रत्येक दिवसाला २५० प्रमाणे अधिक २५००० इतकी शास्ती लावण्याचे अधिकार राज्य माहिती आयोगास आहेत. त्याचसोबत कलम २० (२) अन्वये याच कारणांसाठी संबंधित जन माहिती अधिकारी विरूध्द त्याला लागू असलेल्या सेवानियमान्वये शिस्तभंगविषयक कारवाई करणेची शिफारस करणेचे अधिकार आयोगास आहेत. हे अधिकार एकाच प्रकरणामध्ये एकच अधिकाऱ्याविरूध्द वापरता येऊ शकतात म्हाजेच आयोग एखाद्या अधिकाऱ्यावर शास्ती लादू शकते आणि त्याच प्रकरणात त्याच अधिकाऱ्याविरूध्द शिस्तभंगाच्या कारवाईची शिफारस देखील करू शकते ही तरतूद या कायद्यात करण्यात आली आहे. त्यामुळे एका गुन्ह्यासाठी एकापेक्षा अधिक शिक्षा नको हा जो श्री.वैभव पाटील यांचा युक्तिवाद आहे तो मान्य करता येत नाही.

श्री.वैभव पाटील यांनी आपल्या मौखिक निवेदनात पुढे म्हटले की, दि.३०/६/२०२२ पर्यंत ते उपरोक्त पदावर कार्यरत होते त्यापूर्वी ते दोन महिने वैद्यकिय रजेवर होते. म्हणजे किमान दि.३०/४/२०२२ पर्यंत कार्यरत होते असे दिसून येते. तक्रारकर्ता यांनी माहिती मागणारा अर्ज दि.२४/१/२०२२ रोजी केलेला आहे. त्यामुळे दि.२२/२/२०२२ पर्यंत तक्रारकर्ता यांना माहिती देणे अपेक्षित होते. मागणी केलेली माहिती पाहता ती विस्तृत स्वरूपाची होती किंवा ती माहिती शोधण्यासाठी खूप कालावधी खर्ची करावा लागला असता अशी संभावना दिसून येत नाही. अतिशय सोपी स्पष्ट माहिती मागितली होती. ती देखील जन माहिती अधिकारी देऊ शकले नाही.

श्री.वैभव पाटील यांनी त्यांचे मौखिक युक्तिवादात पुढे असेही म्हटले की, तक्रारकर्ता यांनी मोठया प्रमाणात माहिती अर्ज केले होते त्याची संख्या अंदाजे ७००-८०० अशी आहे. तरी याबाबतची शहानिशा करणे आवश्यक आहे.

यास्तव आयोग पुढील आदेश देत आहे.

**आदेश**

१. तत्कालिन जन माहिती अधिकारी श्री.वैभव पाटील यांच्या युक्तिवादा नुसार तक्रारकर्ता यांनी मोठया प्रमाणात माहिती अर्ज केले होते त्याची संख्या अंदाजे ७००-८०० अशी आहे. तरी याबाबतची शहानिशा करणेसाठी विद्यमान जन माहिती अधिकारी यांनी आयोगास अहवाल सादर करावा की, श्री.वैभव पाटील हे केगाव ग्रामपंचायत येथे कार्यरत असताना तक्रारकर्ता यांनी किती माहिती अर्ज केले होते व त्यापैकी किती माहिती अर्जाची माहिती त्यांनी दिली होती. सदर अहवाल प्राप्त झालेनंतर तत्कालिन जन माहिती अधिकारी श्री.वैभव पाटील यांच्या खुलाशावर निर्णय घेण्यात येईल.

२. प्रस्तुत प्रकरणाची पुढील सुनावणी दि.६/७/२०२६ रोजी दुपारी २.०० वाजता होईल.

**(शेखर चन्द्रे)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**कोंकण खंडपीठ**

कोंकण भवन,
बेलापूर, नवी मुंबई : ४०० ६१४.
दिनांक : १२ मे २०२६ .